जा.क्र.कृमवि/विशी/उपहारगृह/३३९/२०२६
दि. ०५.१०.२०२६

## कृ.म.वि., नागपूर येथे उपहारगृह चालविणेकरीता दरपत्रके मागविण्यासाठी सुचना

कृषि महाविद्यालय नागपूर हे महाराजबाग प्राणिसंग्रहालयांच्या समोर असुन येथे विविध विभागांची कार्यालये आहेत. त्याचप्रमाणे जवळच न्यू यु. जी. कॉम्पलेक्स येथे विद्यार्थ्यांचे क्लासेस होतात. या महाविद्यालयामध्ये एकूण जवळपास १२०० विद्यार्थी तसेच १५० अधिकारी/कर्मचारी आहेत. विद्यार्थ्यांची तसेच कर्मचा-यांची चहा नास्ता इत्यादी बाबींची गरज पुर्ण करण्याकरीता उपहारगृह सुरू करायचे आहे. या उपहारगृहाकरीता परिसरात आवश्यक असलेली खोली उपलब्ध असून ग्राहकांना बसण्यासाठी मोकळा परिसर आहे. या उपहारगृहाकरीता पाण्याची तसेच विजेची व्यवस्था सुदधा उपलब्ध आहे. हे उपहारगृह स्वयंसहायता महिला गटास चालविण्यास देऊन त्यांचेकडून मासिक भाडे घेण्याचे ठरविण्यात आलेले आहे. याकरीता हे उपहारगृह चालविण्याकरीता स्वयंसहायता महिला बचत गटांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहे. करीता खालील तक्त्यांमध्ये संबधीत बचत गटाने आपले दर भरण्याचे करावे.

बचत गटाचे नाव:-

नोंदणी कमांक. :-

| अ.क्र. | विवरण | दर |
|---|---|---|
| १ | कृषि महाविद्यालय नागपूर परिसरात कॅटीन चालविण्याकरीता उपलब्ध सोयीसाठी भाडे रू./महिना देण्यास तयार | |

**अटी व शर्ती**

१.कंत्राटदाराकडे महिला बचत गटाचे नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
२. सदर बचत गटाचे बॅकेमध्ये खाते असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे अध्यक्ष/सचिव यांचे आधारकार्ड आणि पॅन कार्ड असणे गरजेचे आहे.
३. कंत्राटदाराकडे/बचतगटाकडे FDA (अन्न व औषधे प्रशासन) यांचा अन्न सुरक्षा परवाना असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे स्वच्छता आणि गुणवत्तेची निकष पाळणे आवश्यक राहील.
४. नाश्ता, चहा-कॉफी चे दर महाविद्यालय प्रशासनाद्वारे मंजुर केले असावे लागतील. गटाला स्वत:च्या मनाने दर वाढविता येणार नाही.
५. उपहारगृहामध्ये दर्शनी भागात सर्व पदार्थांचे दरपत्रक लावणे अनिवार्य राहील.
६. उपहारगृहातून गुटखा तसेच तंबाखूजन्य पदार्थ त्याचप्रमाणे जंक फुड FDAच्या नियमानुसार विक्री करता येणार नाही.
७. मनपा कडून आवश्यक असलेले प्रमाणपत्रे असणे गरजेचे राहील.
८. यापूर्वी उपहारगृह चालविण्याचा अनुभव असल्याचे प्रमाणपत्र जोडावे.
९. उपहारगृहामध्ये बसण्याची व्यवस्था तसेच गॅस, भांडी व साहित्य ठेवणेकरीता फ्रीज शीतकपाट रॅक इत्यादी साहित्यांची व्यवस्था कंत्राटदारास स्वत: करावी लागेल.
१०. महाविद्यालयाचे विद्यार्थी तसेच कर्मचारी व्यतीरिक्त बाहेरील व्यक्तीस येण्यास परवानगी देता येणार नाही.

(कृपया मागे पहा)

Scanned with OKEN Scanner

११. उपहारगृह चालविण्याचा कालावधी सुरवातीला १ वर्षासाठी असेल काम समाधानकारक असल्यास कंत्राट वाढविल्या जावू शकते. सदर कंत्राट इतर कोणत्याही व्यक्तीला हस्तांरित करता येणार नाही.

१२. मंजुर करण्यात आलेले भाडे हे एक वर्षासाठी असेल. त्यानंतर त्यामध्ये वाढ करण्याचे संपूर्ण अधिकार महाविद्यालय प्रशासनाकडे राहतील.

१३. या व्यतीरिक्त शासनाने उपहारगृहासंबंधाने वेळोवेळी निर्गमीत केलेले नियम व अटी पाळणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

१४. कोणतेही निविदा स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अंतिम अधिकार कृ.म.वि. प्रशासनाकडे (अधिष्ठाता) सुरक्षित राहील.

वरील अटी व शर्ती मान्य असल्यास आपले दरपत्रक मा. सहयोगी अधिष्ठाता कृ.म.वि. नागपूर यांचे नावे दि. १२.१०.२०२६ सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत सादर करावे. बंद पाकीटावर उपहारगृह चालविण्याकरीता दरपत्रके असे स्पष्ट नमुद करावे.

अध्यक्ष
उपहारगृह समीती
कृ.म.वि. नागपूर

Scanned with OKEN Scanner